
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 9 | MAY - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# स्वातंत्र्योतर काळातील भटक्या-विमुक्तांचे स्थान



**प्रा. डॉ. थोरे किशोर धोंडीबा**
सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग प्रमुख
सी. बी. खेडगीज बी. सायन्सं, आर.व्ही. कॉमर्स अॅड
आर. जे आर्टस् कॉलज अक्कलकोट जि. सोलापूर.

## प्रस्तावना-

स्वातंत्र्यं कोणत्या गाढवीचे नाव आहे? असे छातीठोकपणे विचारणारे विद्रोही कवी नामदेव ढसाळ यांच्या या ओळीची आजही प्रकर्षाने जाणीव होती त्याचे कारण भारताला स्वातंत्र्यं मिळून आज 75 वर्ष पूर्ण होवून गेली. तरीही भटक्या-विमुक्तांचे स्थान आजही भारतात व महाराष्ट्राच्या इतिहासात मागासलेल्या वर्गातच समावेश असल्याचे दिसून येते. त्यामूळे आज आपणास भटक्या-विमुक्तांच्या आस्तित्वासाठी त्यांच्या स्थितीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. 15 ऑगस्टं 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला तरी एक विशिष्टं समाज काटेरी कुंपनाच्या पलिकडेच होता. 26 जानेवारी 1950 रोजी भारतात संविधानानुसार चालविण्यास सुरूवात झाली तरीही हा समाज कुंपणाच्या आतच राहीला. 1951 मध्ये पहिली सार्वजनिक निवडणूक घेण्यात आली. ही निवडणूक तब्बलं 68 टप्पयात घेण्यात आली. त्यावेळीही हा समाज तारेच्या कुंपणाच्या आतच होता. स्वातंत्र्यांचे वारे या समाजापर्यंत पोहचलेच नाही.

आजही आपण भारतीय समाजव्यवस्थेचा अभ्यास करीत असताना प्रत्यक्षात जरी तारेचे कुंपण निघाले असले तरी अप्रत्यक्ष कुंपन अजूनही शिल्लक असल्याचे आपणास दिसून येते. या भटक्या-विमुक्तांच्या सर्वांगिन विकासासाठी त्यांच्या सध्यस्थितीचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी हा शोधनिबंध सादर करण्याचा हेतू आहे. स्वातंत्र्योत्तंर काळात भटक्या-विमुक्तांचा विकास किती प्रमाणात झाला याचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## संशोधनाचे उद्देश:-

1. भटक्या विमुक्तांच्या इतिहासाचा अभ्यास करणे.
2. स्वातंत्र्यपूर्व काळ व स्वातंत्र्योत्तर काळातील परिस्थितीची चिकित्सा करणे.
3. भटक्या-विमुक्तांच्या आर्थिक विकासाचा अभ्यास करणे.
4. भटक्या-विमुक्तांच्या विकासासाठी होत असलेल्या प्रयत्नांचा अभ्यास करणे.
5. भटक्या-विमुक्तांच्या समाजिक परिस्थीचा अभ्यास करणे.

### गृहितके:-

भटक्या-विमुक्तांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकिय क्षेत्रात अजूनही इतरांच्या तुलनेत विकास झालेला नाही. त्यासाठी अजून वेगळे प्रयत्न करणे आवश्यंक आहे.

### संशोधन पध्दती:-

या विषयावर शोध निबंध तयार करण्यासाठी मी प्राथमिक व दुय्यंम संदर्भ साधनांच्या आधारे वर्णनात्मकं संशोधन पध्दतीचा वापर केला आहे.

### भटक्या-विमुक्तांचा स्वातंत्र्यपूर्व काळातील इतिहास:-

भारतामध्ये वसाहतकालीन कालखंडापासून गुन्हेगारी जमात म्हणून यांना ओळखले जात होते. 1793 च्या रेग्युलेशन 26 या कायद्याने या जमातीचे गुन्हेगारीकरण करण्यास सुरूवात केली. पुढे 1860 साली भारतीय दंड संहिता अंमलात आणल्यानंतर 198 जमातींना गुन्हेगार ठरविणारा 1871 गुन्हेगार जमाती कायदा तयार केला गेला. संपूर्णत: निसर्गावर अवलंबून असाणारा हा वर्ग वसाहतकाळात गुन्हेगार म्हणून ओळखला जावू लागला. भारतीय जमिनीवरील व जंगलावरील महसूल गोळा करण्याचा अधिकार ब्रिटीश ईस्टं इंडिया कंपनीस मिळाल्यानंतर जंगलावर उदरनिर्वाह करणाऱ्या या जाती व ब्रिटीश यांच्यामध्ये दरी वाढत गेली. टी. व्ही. स्टीफन यांनी तयार केलेला 1871 च्या कायद्याची अंमलबजावणी 12 ऑक्टोंबर 1871 रोजी लागू केला. म्हणून भटके विमुक्तं 12 ऑक्टोंबर या दिवसाला काळा दिवस म्हणून पाळण्यात येतो[1].

भारताचा प्राचीन काळापासूनचा इतिहास अभ्यासला असता प्राचीन काळ, सुलतानशाहीचा कालखंड, मुघल या काळात विमुक्तं व भटके मनोरंजन, कलाकार, कसरती त्याचबरोबर गावगाड्याच्या सोबत विविध छोटेमोटे व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करीत होते. त्यानंतर ब्रिटीश कालखंड मात्र यांचे व्यवसाय तग धरू शकले नाहीत. यांच्या एकून हालचालीवर नियंत्रण प्रस्तापित झाले. त्यांना अनेक गोष्टीमध्ये व व्यवसायामध्ये अनेक बंधने येवू लागली म्हणून या जमातीने विरोधाचे हत्यार उपसले. स्वतंत्र वृत्तीने राहण्याची सवय असलेला हा समाज बंधन घातल्यामुळे इंग्रजांच्या विरोधात बंड करून उभा राहीला. पण ब्रिटीशांनी त्यांच्या मागण्या किंवा आडचणी यांचा विचार न करता त्यांना गुन्हेगार ठरविणारा कायदा केला.

### भटक्या जमातींची ओळख :-

भटक्या जमातीची वैशिष्टये पाहिल्यानंतर त्यांचे वर्गिकरण आपणास करता येईल. यामध्ये त्यांच्या कामाच्या स्वरुपानुसार त्यांचे गट करण्यात आले आहेत.

1. व्यवसायाच्या निमित्ताने भटकणाऱ्या जमातीमध्ये लमाण, बंजारा व वैदू यांचा समावेश होतो.
2. पशुपालन करणाऱ्या जमाती- गोपाल, धनगर, बखरवाल
3. कलावंत जमाती- कोल्हाटी, बहुरुपी, वासूदेव, जोगती, वाघ्या-मुरळी, कडक लक्ष्मी, नट
4. देवदेवतांच्या नावाने भीक मागणाऱ्या जमाती- नाथपंथी डवरी गोसावी, मरीआईवाले, दुर्गुमुर्गूवाले
5. कष्टाची कामे करणाऱ्या जमाती- वडार, पाथरवट, कैकाडी, लोहार
6. भविष्यं सांगणाऱ्या जमाती- जोशी, कुडमूडे जोशी, पोपटवाले

7. शिकार करणाऱ्या जमाती- पारधी, फाशेपारधी
8. प्रस्तापित जातीच्या मागत्या जमाती- रायरंद, डक्कलवार
9. प्राण्यांच्या कसरती करीत भीक मागणाऱ्या जमाती- सापवाले, उंटवाले, हत्तीवाले, अस्वलवाले (दरवेशी), माकडवाले (मदारी)

लोकसंख्येचा विचार करता महाराष्ट्रामध्ये 10 ते 15 टक्के भटके- विमुक्तं असल्याचे विविध अहवालामधून दिसून येते. 2011 ची जनगणनेनुसार महाराष्ट्रात 71.12 लाख व वार्षिक टक्केवारीचा विचार करता अंदाजे सध्या भटके विमुक्तं 82.67 लाख असल्याचे दिसून येते[2]. पण एवढी मोठी लोकसंख्या अन्नं, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्यं व सन्मान यांच्यापासून वंचित असल्याचे दिसून येते.

## भटके-विमुक्तं व सेटलमेंटः-

ब्रिटीश काळात गुन्हेगार मानलेला समाजाला 1911 नंतर काही बंदिस्त आणि काही उघडे असे काटेरी तारेचे कोंडवाडे तयार करण्यात आले. त्यालाच सेटलमेंट असे म्हटंले जाते. या सेटलमेंटस म्हणजे ब्रिटीश सरकारने गुन्हेगार मानलेल्या या जमातींना कायद्यानुसार 17 फुट मजबूत तीन तारेचे कुंपन घालून उभ्या केलेल्या वसाहती होय. अशा जवळपास 52 वसाहती देशभर उभारण्यात आल्या यामध्ये महाराष्ट्रातील मुंढवा, पुणे, बारामती, अंबरनाथ, संभाजीनगर, अंबरनाथ, जळगाव, सोलापूर अशा महत्त्वाच्या गावामध्ये असे सेटलमेंट उभी करण्यात आले[3]. सुरूवातीच्या काळात गुन्हेगार असणाऱ्या लोकांना या सेटलमेंट मध्ये पाठवित असत. पण नंतर या जमातीच्या सर्वच लोंकांना या ठिकाणी पाठविण्यात येत होते.

## भटके- विमुक्तं अभ्यास करण्यासाठीच्या समित्याः-

स्वातंत्र्योत्तरं काळात या विविध जमातीचा अभ्यास करण्यासाठी सरकारी व खाजगी अशा अनेक समित्या नेमण्यात आल्या व त्यांनी अभ्यास करुन आपला अहवाल सादर केला. यामध्ये अंत्रोळीकर कमिटी- 1950, अय्यंगार कमिटी- 1950, कालेलकर कमिटी- 1953, राजवाडे समिती- 1956, थाडे समिती- 1960, लोकूर कमिटी- 1965, मंडल आयोग- 1980, इदाते आयोग- 1999, न्यायमूर्ती व्यकंट चलय्या कमिशन- 2002, रेणके राष्ट्रीय आयोग- 2008, नरेंद्र जाधव समिती- 2012, भिकू इदाते राष्ट्रीय कमिशन- 2018 अशा अनेक समित्या स्थापन करण्यात आल्या. या समितीने आपले अहवाल सादर केले त्यांची अंमलबजावणी मात्र झाल्याचे दिसून येत नाही.

## भटक्या- विमुक्तांच्या जातपंचायतीः-

आजही भारताला स्वातंत्र्यं मिळाल्यापासून अजूनही भारताचा कायद्याचा वापर या जमाती करीत असल्याचे दिसून येत नाही. या समाजाचे आपल्या स्वताच्या जातपंचायती आजही आहेत. आपल्याती अंतर्गत वाद किंवा भांडणे आपापल्या जातपंचायतीमध्ये सोडवित असतात. त्यांच्या वेगळ्या नियमावली असतात. एक हजारपेक्षा जास्तं भटक्या जाती- जमातीत असे नियम व जातपंचायती कार्यरत असल्याचे दिसते. जातपंचायती जगण्याचे नियमन विशद करणारी संस्था म्हणून याकडे पाहिले जावू शकते. विवाह, जन्मं, व्यवसायातील नीती, जमातीबाहेरील व्यक्तींशी वागण्याची पध्दतं, जमातीतील लोंकांशी वागण्याची रीत यावर मौखिक नियम जातपंचायतीमध्ये पाळले जातात. या जातपंचायतीमध्ये स्त्रीयांचे स्थान दुय्यम असून येथील

नीतीनियम तीच्याभोवतीच फिरत असतात. वर्षभर कुठेही फिरत असली तरी ही जमात वर्षातून एकदा तरी एकत्र जमत असते. एक म्हणजे धार्मिक विधीसाठी किंवा पंचायतीसाठी. या दोन कारणासाठी जरी हे एकत्र येत असले तरी त्याबरोबरच इतरही काही गोष्टी साध्यं होत असतात. त्या गोष्टी म्हणजे दूर गेलेल्यांना भेटणे, लग्नं जमविणे, फारकत देणे-घेणे, आर्थिक व्यवहार, भांडणे, मारामाऱ्या, विवाहबाह्य संबंध, जन्मं, मृत्यू अशा गोष्टींचा समावेश होतो.

महाराष्ट्रामध्ये भटक्याची सहा न्यायपीठे महत्त्वाची मानली जातात. त्यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील कारुंडे, सातारा जिल्ह्यातील वर्णे आबापूरी, अहिल्यादेवी नगर (अहमदनगर) मधील मढी, धाराशिव (उस्मानाबाद) मधील सोनारी, पुणे जिल्ह्यातील जेजूरी आणि नांदेडमधील माळेगाव ही होती[4]. तरीही मढी याठिकाणी आयोजित जातपंचायतीला मोठा दर्जा आहे. सर्व जातपंचायतीमध्ये मढी जातपंचायतीला सर्वोच्चं न्यायालयाचा दर्जा आहे. या जातपंचायती एक दिवसापासून ते आठ दिवस कधीकधी महिनाभर चालत असत. एका जात पंचायतीमध्ये पाच पंच आसतात. पंचायतीचे काही नियम असत त्यामध्ये पंचायतीमध्ये पायात चप्पलं घालून प्रवेश करता येत नाही. काही ठिकाणी स्त्रीयांना प्रवेश बंदी होती. या जातपंचायतीची विशिष्टं भाषा होती ती त्या त्या समाजाला समजत असे. या जातपंचायतीचे सर्व व्यवहार तोंडी असत. एखाद्यावेळी निवाडा झाला नाही तर दुसऱ्या ठिकाणी भरणाऱ्या जातपंचायतीमध्ये निवाडा केला जात असे. पंच वादी-प्रतिवादीची बाजू एकूण घेऊन आपसात चर्चा करून निर्णय जाहीर करतात. या जातपंचायतीमध्ये दंडाचे स्वरुप बहूतेकवेळा आर्थिक दंडाचे, आर्थिक भरपाईचे काहीवेळा वैयक्तिक मानहानीचे तर काही वेळा शारिरीक इजेचे असे होते[5].

या जातपंचायतीमध्ये पंच म्हणून काम करणारे त्यांच्या समाजातील श्रीमंत किंवा समाजातील अभिजन लोक असतात. कधीकधी त्यांची दंडेलशाही या पंचायतीमध्ये चालते. आपल्या जाती-जमातीतल्या व्यक्तींचे जीवन पंच नियंत्रित करीत असल्याचे दिसून येते. जन्माला येण्यापूर्वी पोटातल्या बाळापासून ते मरणांनंतरच्या विधीपर्यंत या पंचाचे नियंत्रण आसते. तथाकथित न्यायनिवाडा तेच करतात व शिक्षाही तेच देतात. बहूतांश जात-पंचायतीमध्ये पंचाना देवाचा आवतार समजले जाते. त्यामुळे त्यांचा निर्णय अंतिम असतो. त्यांचा शब्दं पीडितापैकी कोणीच मोडत नाही. आपली जात-जमात शुध्दं रहावी यासाठी ही पंचायत प्रयत्नं करीत असत[6]. त्यामुळे या भटक्या-विमुक्तांच्या जमातीमध्ये आंतरजातीय विवाहास मान्यता नाही. ते विवाह जातपंचायत फेटाळून लावत असत. असा आंतरजातीय विवाह केल्यास जातपंचायतीतील सर्वात मोठी शिक्षा जातीतून बहिष्कृत केले जात असे. अशा बहिष्कृत व्यक्तींबरोबर जमातीतील इतर कोणी संबंध ठेवल्यास त्याला आर्थिक दंड केला जात असे[7].

## भटक्या-विमुक्तांची जनजागृती व चळवळी:-

भटक्या- विमुक्तं जमातींना भारताच्या मूळ प्रवाहात आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. पण त्यासाठी सर्वात मोठी आडचण जाणवते ती कागदपत्रांची कारण आपल्या सरकारी नियमानुसार आपले अस्थित्वं सिध्दं करण्यासाठी व कोणतेही सरकारी कागदपत्र काढण्यासाठी सर्वात महत्त्वाचे कागदपत्र आहे रहिवाशी दाखला. रहिवाशी दाखला असल्याशिवाय आपले राष्ट्रीयत्वं सिध्दं होत नाही[8]. आजकाल बांग्लादेशी घुसकोरीचा मुद्दा देशात गाजत आहे त्यावेळी या रहिवाशी दाखल्याचे महत्त्वं व गरज आपल्या लक्षात येते. पण अशा नियमावलीचा सगळ्यात मोठा फटका या भटक्या- विमुक्तांना बसत आहे. या जातीजमातीमध्ये सर्वात महत्त्वाची आडचण रहिवाशी दाखल्याची आहे. परंतू आयुष्यभरं भटके आयुष्यं जगणाऱ्या या जमातींना सरकारी कागदपत्रे मिळविणे अत्यंत आडचणीचे ठरत आहे. वेगवेगळ्या भूप्रदेशात फिरणारी ही जमात भूप्रदेश, भाषा, संस्कृती, वंश अशा

कोणत्याच गोष्टीत समानता दिसत नाही त्यामुळे यांचे मूळ शोधणे अत्यंत आडचणीचे होत आहे. सरकारी कार्यालयात लेखी पूराव्याशिवाय पान हालत नाही. यांच्याकडे कोणतेच पुरावे नाहीत मग लेखी पुरावे कशी मिळणार हा प्रश्न् आहे.

आज मात्र हा भटका समाज सजग होत असल्याचे दिसून येत आहे. 1999 च्या इदाते अहवालानूसार यांचा साक्षरतेची व शिक्षणाची टक्केवारी वाढत असल्याचे दिसून येत आहे. आज महाराष्ट्रात 52 विमुक्तं जाती- भटक्या जामातीच्या एक हजारपेक्षा जास्तं संघटना असल्याचे या अहवालात नोंदविले आहे[9]. भटक्या विमुक्तांना जातीचा दाखला काढण्यासाठी लागणारा 1961 सालच्या वास्तव्याचा पुराव्याची अट रद्द करणयाची मागणीला जोर दिला जात आहे[10]. पारंपारिक जगण्याची साधने कमी झाल्यामुळे कौशल्यात्मकं शिक्षण मिळावे यासाठी मागणी केली जात आहे. विमुक्तं- भटक्यांनी मोर्चे, धरणे, रस्ता रोको, घेराव, निवेदन अशा विविध मार्गांनी चळवळी करायला सुरूवात केली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भटक्या-विमुक्तांना एक सुत्र दिलेले आहे. ते सुत्र म्हणजे 'उदरनिर्वाहाची पारंपारिक साधने त्यागल्याशिवाय नव्या उत्पादनाच्या साधनावर मालकी हक्कं सांगता येत नाही' हे या जमातींना आता पटू लागले आहे. त्यामुळे अलिकडे या जमाती आंबेडकरविचाराकडे झुकत असल्याचे दिसून येत आहे[11]. जगण्याची नवी साधने हाताशी नसतानाही भटक्यांनी आपल्या उदनिर्वाहाची पारंपारिक साधने त्यागण्याचे ठरविले आहे. नंदीवाल्यांने आपला बैल, अस्वलवाल्यांनी आपला आस्वलं, सपेरेंनी आपला साप इतकेच नाही तर नाथबाबा- नाथपंथी- नाथबुवा, बाबा-बैरागी यांनी आपल्या भीक मागणाऱ्या झोळ्यांचा त्याग केला.

आपल्या उदरनिर्वाहाचा पारंपारिक साधने त्याग करुन तो सर्व ऐवज सरकारदरबारी टाकला व आज सरकारकडे 'आता आम्हाला जगण्यासाठी आधुनिक साधने द्या. त्यांची कौशल्यं द्या. शिक्षण द्या. जगण्याची शाश्वती द्या' अशा मागण्या केल्या जात आहेत[12]. आपल्या विविध मागण्यासाठी अनेक ठिकाणी बोंबाबोंब मोर्चे व बिऱ्हाड मोर्चा आयोजित केले जात आहे. या मोर्चामध्ये आपली बिऱ्हाडे, कोंबडी-कुत्री-गाढवे-घोडी-बाया-पोरे-म्हातारी-कोतारी यांना घेऊन शेकडो किलोमिटर पायी चालत. रस्त्यांने शंकानाद, बोंबाबोंब करीत मंत्रालयावर मोर्चे काढले जात आहेत. प्रबोधनाचे कार्यक्रम करुन आपल्या समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी मोठ्याप्रमाणात भर दिला जात असल्याचे दिसून येत आहे[13].

## भटक्या-विमुक्तांसाठी सरकारच्या योजना:-

महाराष्ट्रामध्ये या जमातींना सर्वसाधारण प्रवाहात आणण्यासाठी अनेक योजना निर्माण झाल्याचे दिसून येते. त्यामध्ये 2003 पासून भटक्या जमातीच्या मुलांना शिक्षणामध्ये इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांप्रमाणे शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे. या शिष्यवृत्तीमध्ये निर्वाह भत्ता, शिक्षण फी, प्रयोगशाळा फी यांचा समावेश होतो. त्याचबरोबर राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती, गुणवत्ता शिष्यवृत्ती व दारिद्रय रेषेखालील विद्यार्थ्यांना शिक्षण फी यासारख्या योजना राबविण्यात येत आहेत[14].

सन 2011-12 पासून विमुक्तं जाती भटक्या जमातीकरीता यशवंतराव चव्हाण मुक्तं वसाहत योजना सुरु करण्यात आली आहे. त्याचबरोबर आश्रमशाळा निर्माण केल्या जात आहेत. या जमातीच्या विविध प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी व त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी 'राजर्षी शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) ही संस्था सुरु केलेली आहे. महाराष्ट्रातील विविध अर्थसंकल्पामध्ये या समाजासाठी मोठ्याप्रमाणात तरतूदी करीत असल्याचे दिसून येत आहे. 2017-18 व्सर अर्थसंकल्पामध्ये 2 हजार 384 कोटी रु., 2020-22 च्या अर्थसंकंल्पात 100 कोटी अतिरिक्त तरतूद केली असल्याचे दिसून येते. त्याचबरोबर 'क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले घरकूल योजना' राबविण्याचे प्रस्तावित आहे[15].

सरकार दरबारी याबाबत असलेली नैराश्यत्माक भुमिका व नाकर्तेपणा यामुळे या जमातीपर्यंत या योजना पोहचल्या नसल्याचे दिसून येत आहेत. 2021-22 मध्ये केंद्रं सरकारने भटक्या जमातीसाठी 50 कोटी रुपयांचे बजेट घोषित करण्यात आले, पण यातील एक पैसाही खर्च केला नाही.

## समारोप व निष्कंर्ष:-

आपला भारत हा विविधतेने नटलेला आहे. यामध्ये भटक्या- विमुक्तांचा सहभागही अत्यंत महत्त्वाचा आसल्याचे दिसून येते. पण रीती-रिवाज, परंपरा व वर्णव्यवस्था यांच्या जोखडात आजूनही गुंतलेला असल्याचे दिसून येते. आपल्या व्यवस्थेमध्ये भटक्या-विमुक्तं जाती आर्थिक बाबतीत खुप मागासलेल्या दिसून येत आहेत. इतर मागासलेल्या जाती डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शाहू-फुले यांचा विचार अंगिकारुन आपल्या समाजाचा विकास करुन घेतल्याचे दिसून येते. पण् या जमातीत शाहू-फुले-आंबेडकर आजपर्यंत पोहचल्याचे दिसत नाही. आपल्या परंपरामध्ये आजही हा समाज गुरफटलेला दिसून येतो. या समाजाला आपला विकास करायचा असेल तर मागासलेल्या सर्व गोष्टींचा त्याग करुन नवविचार अंगिकारणे गरजेचे आहे. उपरोक्त सांगितल्याप्रमाणे या जमातीसाठी अनेक आश्रमशाळा निर्माण करण्यात आल्या आहेत. पण आज विद्यार्थी संख्येच्या अभावी अनेक आश्रमशाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. भारतामध्ये नाही तर जगामध्ये खाऊजा धोरणामुळे या समाजाला मोठ्या प्रमाणात आपल्या स्व्त:मध्ये खुप मोठे परिवर्तन करणे गरजेचे आहे. आपल्यात परिवर्तन केले नाही तर आपण पुन्हा एकदा आर्थिक गर्तेत जाण्यास वेळ लागणार नाही.

## संदर्भ ग्रंथ:-


1. साने मिनाक्षी, तथाकथित ‘गुन्हेगार जमाती’ च्या चळवळीच्या इतिहासातील काही गहाळ झालेली पाने, भारतीय कम्युनिस्टं पक्ष, 1947 महाराष्ट्रं राज्यं कौन्सिल प्रकाशन, मुंबई
2. भोसले नारायण, भटक्या –विमुक्तांचे पितृसत्ताक जातपंचायत: परंपरा आणि संघर्ष, 2008, द ताईची प्रकाशन, पुणे
3. इदाते अभ्यास अहवाल, 1999 महाराष्ट्रं सरकार, मुंबई
4. कित्ता
5. माने लक्ष्मणं, विमुक्तायण, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण, मुंबई, 1997
6. उपरोक्तं इदाते,
7. भोसले नारायण, विमुक्ती प्रबोधन, अथर्व प्रकाशन, जळगाव, 2013
8. मोरे माधव बंधू, आदिवाशी बोलू लागला, सुगावा प्रकाशन, 2006,
9. कित्ता
10. पश्चिम महाराष्ट्रातील भटके गोसावी समाजाच्या सामाजिक- आर्थिक परिस्थितीचा अभ्यास, डॉ बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे 2021
11. ढेरे रा. चि., लोकसंस्कृतीचे उपासक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, 1996
12. रेणके अहवाल, भटके व अर्धभटके राष्ट्रीय कमिशन, नई दिल्ली, 2008
13. कित्ता,

14. भोसले नारायण, डॉ. आंबेडकरांनी केलेली इतिहासमीमांसा, अथर्व प्रकाशन, जळगाव, 2013
15. कित्ता